मौजे निगुडवाडी बौध्दवाडी पाणी पुरवठा योजना (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) या नळ पाणी पुरवठा योजनेच्या अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः ग्रापापु १३१७/प्र.क्र.१०४/पापु ०६
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मुंबई-४०० ०३२
तारीखः - २५ जानेवारी, २०१८

वाचा -

१) मूळ प्रशासकीय मंजूरी ग्रामसभा ठराव क्र.१०(१) दि.२७.१२.२०११.
२) कार्यकारी अभियंता (ग्रापापु), जिल्हा परिषद, रत्नागिरी यांची तांत्रिक मान्यता बाब क्र.४६, दि. माहे मार्च, २०१२.
३) शासन निर्णय ग्रापाधो-१११९/प्र.क्र.१३४/पापु-०७,दि.२०/०२/२०१५.
४) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या त्रयस्थ तांत्रिक परिक्षणाबाबतचा शासन निर्णय ग्रापाधो-१११४/प्र.क्र.६१/पापु-०७,दि.१५/०६/२०१५ व दि.१४ मार्च, २०१६
५) कार्यकारी अभियंता (ग्रापापु), जिल्हा परिषद, रत्नागिरी यांची सुधारीत तांत्रिक मान्यता बाब क्र.९८, दि.माहे डिसेंबर, २०१६
६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांचे क्र.रजिप/ग्रापापु/तांशा-३/२३२६, दिनांक २४ मे, २०१७

प्रस्तावना -

मौजे निगुडवाडी बौध्दवाडी पाणी पुरवठा योजना (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) या नळ पाणी पुरवठा योजनेच्या रु.**३६,०१,३७७/- (**ढोबळ) किमतीच्या अंदाजपत्रकास संदर्भीय क्र.**१** येथील आदेशान्वये कार्यकारी अभियंता (ग्रापापु), जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी तांत्रिक मान्यता दिली असून संदर्भ क्र.**२** येथील ग्रामसभा ठरावान्वये मुळ प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तथापि महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे कोटेशन जादा दराने प्राप्त झाल्यामुळे योजनेच्या खर्चात वाढ झाली. यास्तव कार्यकारी अभियंता (ग्रापापु), जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी संदर्भ क्र.५ येथील आदेशान्वये प्रस्तुत योजनेच्या रु.**४१,२३,६८१/-** (ढोबळ) किंमतीच्या प्रस्तावास सुधारीत तांत्रिक मान्यता दिली असून संदर्भ क्र.६ अन्वये प्रस्तुत नळ पाणी पुरवठा योजनेच्या आराखडयास व अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. तद्नुषंगाने प्रस्तुत योजनेच्या आराखडयास व अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती

शासन निर्णय-

मौजे निगुडवाडी बौध्दवाडी पाणी पुरवठा योजना (ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी) या नळ पाणी पुरवठा योजनेच्या रुपये **४१,२३,६८१/-**(ढोबळ) (अक्षरी रुपये एकेचाळीस लाख तेवीस हजार सहाशे एक्याऐंशी फक्त) एवढ्या सुधारित किंमतीच्या अंदाजपत्रकास पुढील अटींच्या अधिन राहून सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अटी

१) उपरोक्त नमुद सुधारित किंमतीत उर्वरित सर्व कामे ६ महिन्यात पूर्ण करावीत.

२) या योजनेस सहमती दिलेल्या मूळ प्रशासकीय मान्यतेच्या तसेच सुधारीत तांत्रिक मान्यता देतांना नमुद केलेल्या अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

३) ही योजना राबविणे, त्याचे परिरक्षण, दुरुस्त्या (विशेष दुरुस्त्या धरुन) या साठी दरवर्षी येणारा आवर्ती खर्च भागविण्यासाठी, योजनेतील घसारा किंवा यंत्रसामुग्री नुतनीकरणासाठी संबंधित ग्रामपंचायतीस शासनाकडून कोणतीही मदत मिळणार नाही.

४) सदर योजना पुर्ण झाल्यावर स्थानिक स्वराज्य संस्थेने (संबधित जिल्हा परिषद) योजना हंस्तातरित करुन घेणे बंधनकारक राहील.

५) सन २०१३ मधील CAG च्या अहवालानुसार राज्यातील २१% पाणी पुरवठा योजना या देखाभाल दुरुस्ती अभावी, वीज देयक न भरल्यामुळे (Poor maintenance/nonpayment of electricity of bills) बंद पडल्या असल्याचे दिसून येते. यास्तव सदर योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम राहण्याच्या दृष्टीने पाणीपट्टी दरामध्ये आवश्यकतेनुसार वाढ करण्याची जबाबदारी संबधित ग्रामपंचायत यांची राहील.

६) हगणदारीमुक्ती बाबतच्या प्रचलित धोरणानुसार कार्यवाही करण्यात यावी.

७) संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णयातील निर्देशानुसार त्रयस्थ तांत्रिक परिक्षणाची कार्यवाही करण्यात यावी.

८) प्रस्तुत योजना कोणत्याही परिस्थितीत पुनर्सुधारीत केली जाणार नाही तसेच योजनचे लेखे बंद करणे याची जबाबदारी कार्यकारी अभियंता (ग्रापापु) जिल्हा परिषद, रत्नागिरी यांची राहील.

२. या योजनेच्या सुधारित किंमतीतील वाढीव खर्च रु.५,२२,३०४/- (अक्षरी रुपये पाच लाख बावीस हजार तीनशे चार फक्त) हा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमा खालील राज्य हिश्श्यातून /जिल्हा नियोजन मंडळाकडून /किमान गरजा कार्यक्रमांतर्गत उपलब्ध होणा-या निधीतून करण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२९१५१६००५९२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vasant Bhimrao Mane

Digitally signed by Vasant Bhimrao Mane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=280e2beac20f526041fee94f6226522e1407a7f6aa0b06c8769634d48c2976bc, cn=Vasant Bhimrao Mane
Date: 2018.01.29 17:03:16 +05'30'

(व. भि. माने)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.
२) मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.
३) विरोधी पक्ष नेता, विधान सभा/विधान परिषद, विधान मंडळ, मुंबई.
४) मा.विधानमंडळ सदस्य (सर्व)
५) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
६) महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-२, नागपूर.
७) महालेखापाल, लेखापरीक्षा, महाराष्ट्र १, मुंबई
८) जिल्हाधिकारी, रत्नागिरी.
९) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी.
१०) संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था(वासो), बेलापूर, नवी मुंबई.
११) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवीन पनवेल.
१२) अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, नवीन पनवेल.
१३) संचालक(वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, बेलापूर,नवी मुंबई.
१४) उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, कोकण.
१५) वरिष्ट भुवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, रत्नागिरी.
१६) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, रत्नागिरी.
१७) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरी.
१८) अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१९) मु.अ. तथा वि.का.अ. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
२०) कार्यासने (पापु-०४,,०७,०९,१०,१३,१७,१८ व २०), पा. पु. व स्व. वि.,मंत्रालय,मुंबई-३२.
२१) निवडनस्ती कार्यासन पापु-०६.